**विभागाचे नाव :- बांधकाम विभाग, मुख्यालय जव्हार जिल्हा परिषद पालघर**

**खाते प्रमुख पदनाम :- कार्यकारी अभियंता**

**विभागाचा दुरध्वनी क्रमांक :- मुख्यालय जव्हार ०२५२०-२२२४२०**

**पालघर निवासी कार्यालय ०२५२५-२५५४२०**

---

**विभागांतर्गत येणाऱ्या विविध योजना, स्वरुप व माहिती:-**

१. **रस्ते दुरुस्ती कार्यक्रम :-**

रस्ते परिरक्षण व दुरुस्ती अंतर्गत शासनाकडुन कार्यक्रम मंजुर होउन जिल्हा परिषद अंतर्गत ग्रामिण भागातील रस्त्याची दुरुस्ती तसेच खडीकरण अंतर्गत नविन रस्ते घेतले जातात.

**योजनेमधे सहभागाच्या अटी, शर्ती व पात्रता :**

बि-१ निविदा अटी शर्तीनुसार जिल्हा परिषद कडील नोंदणीकृत ठेकेदारा मार्फत कामे केली जातात. रु. ३.०० लक्ष पर्यंत ची कामे काम वाटप समिती मार्फत व ३.०० लक्ष व त्यावरील कामे ई-निविदा पध्दतीने केली जातात.

## २. <u>जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजना :-</u>

जिल्हा वार्षिक आदिवासी उप योजने अंतर्गत शासना कडुन कामे अर्थसंकल्पित करुन मंजुर करण्यात येतात. सदरच्या कामांना महाराष्ट्र शासन (आदिवासी विभाग) व जिल्हा नियोजन समिती यांचे कडुन निधी प्राप्त होउन आदिवासी क्षेत्रात व रस्त्यांच्या कामावर निधी खर्च केला जातो.

**योजनेमधे सहभागाच्या अटी, शर्ती व पात्रता :**

बि-१ निविदा अटी शर्तीनुसार जिल्हा परिषद कडील नोंदणीकृत ठेकेदारा मार्फत कामे केली जातात. रु. ३.०० लक्ष पर्यंत ची कामे काम वाटप समिती मार्फत व ३.०० लक्ष व त्यावरील कामे ई-निविदा पध्दतीने केली जातात.

## ३. जिल्हा वार्षिक बिगर आदिवासी योजना :-

लोक प्रतिनिधी यांनी सुचविलेली कामे जिल्हा नियोजन मंडळ यांचे कडे प्रस्तावित केली जातात.

**योजनेमधे सहभागाच्या अटी, शर्ती व पात्रता :**

बि-१ निविदा अटी शर्तीनुसार जिल्हा परिषद कडील नोंदणीकृत ठेकेदारा मार्फत कामे केली जातात. रु. ३.०० लक्ष पर्यंत ची कामे काम वाटप समिती मार्फत व ३.०० लक्ष व त्यावरील कामे ई-निविदा पध्दतीने केली जातात.

## ४. **आमदार/ खसदार/ डोंगरी विकास कार्यक्रम :-**

आमदारांचा स्थानिक विकास कार्यक्रम, खासदारांचा स्थानिक विकास कार्यक्रम तसेच डोंगरी विकास कार्यक्रमा अंतर्गत मा. आमदार/ खासदार व लोक प्रतिनिधी यांनी त्यांच्या मतदार संघात सुचविलेली कामे जिल्हा नियोजन विभागामार्फत मंजुर होउन रस्ते, सामाजिक सभागृह, चावडी इमारती, शाळा, वॉल कंपाउंड इत्यादी कामे केली जातात.

**योजनेमधे सहभागाच्या अटी, शर्ती व पात्रता :**

मा. आमदार/खासदार महोदयांनी प्रस्तावित केलेली कामे आवश्यकते नुसार केली जातात. बि-१ निविदा अटी शर्तीनुसार जिल्हा परिषद कडील नोंदणीकृत ठेकेदारा मार्फत कामे केली जातात. रु. ३.०० लक्ष पर्यंत ची कामे काम वाटप समिती मार्फत व ३.०० लक्ष व त्यावरील कामे ई-निविदा पध्दतीने केली जातात.

## ५. <u>पुरहानी कार्यक्रम :-</u>

सदरच्या योजने अंतर्गत पावसाळ्यात अति पर्जन्यवृष्टी मुळे खराब झालेले रस्ते वाहतुकिस पुर्ववत करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम व ग्राम विकास खात्या मार्फत मंजुरी दिली जाते.

**योजनेमधे सहभागाच्या अटी, शर्ती व पात्रता :**

पुरहानी मुळे ज्या रस्त्यावरील वाहतुक बंद पडली आहे त्यास प्रामुख्याने प्राधान्य दिले जाते, या मधे प्राधान्याने मोऱ्या, पेव्हड डीप, पुल दुरुस्ती, भराव दुरुस्तीची कामे बि-१ निविदा अटी शर्तीनुसार जिल्हा परिषद कडील नोंदणीकृत ठेकेदारा मार्फत कामे केली जातात. रु. ३.०० लक्ष पर्यंत ची कामे काम वाटप समिती मार्फत व ३.०० लक्ष व त्यावरील कामे ई-निविदा पध्दतीने केली जातात.

६. **<u>सार्वजनिक आरोग्य :-</u>**

सदरच्या योजने अंतर्गत जिल्हा परिषद स्तरावर आरोग्य इमारती, प्राथमिक आरोग्य केंद्र, प्राथमिक आरोग्य उप केंद्र, वैद्यकिय अधिकारी/ कर्मचारी निवासस्थाने इत्यादींची दुरुस्तीची कामे घेतली जातात.

**योजनेमधे सहभागाच्या अटी, शर्ती व पात्रता :**

सदर योजने मधील समाविष्ट असणारी कामे तालुका आरोग्य अधिकारी यांच्या संमतीने सुचविल्या नंतरच बि-१ निविदा अटी शर्तीनुसार जिल्हा परिषद कडील नोंदणीकृत ठेकेदारा मार्फत कामे केली जातात. रु. ३.०० लक्ष पर्यंत ची कामे काम वाटप समिती मार्फत व ३.०० लक्ष व त्यावरील कामे ई-निविदा पध्दतीने केली जातात.

## ७. <u>शिक्षण विभागाकडील निधी :-</u>

सदर योजने अंतर्गत शिक्षण विभागाकडील इमारती (शाळा ई.) यांची देखभाल व दुरुस्तीची कामे घेतली जातात.

## <u>योजनेमधे सहभागाच्या अटी, शर्ती  व पात्रता :</u>

सदर योजने मधील कामे तालुका स्तरावरुन गट शिक्षण अधिकारी यांच्या मार्फत सुचविले जातात. जिल्हा शिक्षण अधिकारी (प्राथमिक) यांच्या मार्फत सदर कामांना प्रशासकिय मान्यता प्राप्त होते. त्यानंतर बांधकाम विभागा मार्फत बि-१ निविदा अटी शर्तीनुसार जिल्हा परिषद कडील नोंदणीकृत ठेकेदारा मार्फत कामे केली जातात. रु. ३.०० लक्ष पर्यंत ची कामे काम वाटप समिती मार्फत व ३.०० लक्ष व त्यावरील कामे ई-निविदा पध्दतीने केली जातात.